पुढारी दि 7.8.25

# घरून पळालेल्या व अपहरण झालेल्या दोन अल्पवयीन मुलींचा सत्वर शोध !

**नांदेड :** आई-वडील रागावल्यामुळे घरातून निघून गेलेल्या तसेच दुसऱ्या एका घटनेत अपहरण झालेल्या दोन अल्पवयीन मुलींना शोधण्यात नांदेड पोलिसांना यश आले. यांतील घरातून पळून गेलेल्या मुलीला पोलिसांनी ९ तासांतच शोधून काढले.

ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका कुटुंबातील पालकांनी अभ्यासासाठी आपल्या मुलीला बुधवारी सकाळी रागावल्यानंतर या मुलीने घरातून पळ काढला. त्यानंतर हा प्रकार लक्षात आल्यानंतर संबंधित पालकांनी ग्रामीण पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदविली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामीण पोलिसांनी चार पथकांच्या माध्यमातून तपास सुरू केला. घरातून निघून गेलेली ही मुलगी जालना येथे पोहचल्याचे समजल्यानंतर जालना पोलिसांच्या मदतीने तिला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी या मुलीचे समूपदेशन करून तिला पालकांच्या स्वाधीन केले.

नांदेडमध्ये वरील घटनेचा तपास सुरू असतानाच उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका मुलीचे ४ ऑगस्ट रोजी अपहरण करण्यात आले होते. या मुलीचाही बुधवारी शोध लागला. ही अल्पवयीन मुलगी शिकवणीसाठी घराबाहेर पडली होती. परंतु नंतर घरी न परतल्यामुळे आई-वडिलांनी उस्माननगर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदवली. तब्बल ४८ तासांनंतर ही मुलगी सोलापूर जिल्ह्यातील शिखर शिंगणापूर येथे असल्याचे समजल्यानंतर उस्मानगर पोलिस ठाण्याच्या पथकाने तेथे जाऊन मुलीला ताब्यात घेतले व नातेवाईकांकडे सुपूर्द केले. पोलिस पथकाने तत्काळ केलेल्या या कारवाईचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे.